**विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराज्य सीमा परिषद-2018 यशस्वीरित्या संपन्न**

***

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या अधिपत्याखाली पोलीस अधीक्षक, अहमदगनर, धुळे, जळगाव, नंदूरबार व नाशिक ग्रामीण असे एकुण 05 पोलीस घटक आहेत. सदर घटकांच्या भौगोलिक क्षेत्रास गुजरात राज्य, मध्यप्रदेश राज्य व दादरा व नगर हवेली या केंद्रशासीत प्रदेशाची सीमा लागून आहे.

2. अनाधिकृत अग्निशस्त्रांची निर्मिती, अवैधरित्या त्यांची तस्करी, विक्री करणे. दारु, गांजा, चरस ई. अंमली पदार्थांची तस्करी करणे, अवैधरित्या जनावरांची वाहतुक तसेच खुन करणे, चोऱ्या करणे, दरोडे टाकणे, समाज विघातक कृत्ये करणे, लुटमार करणे, वाहन चोरी टोळी ई. अनेक प्रकारच्या गुन्हयांचे प्रमाण आंतरराज्य सीमेवर दिसून येते. बहुतांशी गुन्हेगार गुन्हे करुन इतर लगतच्या राज्यामध्ये पलायन करतात तसेच इतर लगतच्या राज्यांमध्ये गुन्हे करुन महाराष्ट्रामध्ये आल्याचे सुध्दा दिसून येते.

3. या सर्व गोष्टींचा विचार करुन विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक श्री. विनय कुमार चौबे यांनी दिनांक : 24.05.2018 रोजी समर्पण हॉल, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे आंतरराज्य सीमा परिषद-2018 आयोजीत केली.

4. मालमत्ता विरोधी गुन्हे करणारे गुन्हेगार, पाहिजे व फरार असलेल्या आंतरराज्य गुन्हेगारांबाबत माहितीची देवाण-घेवाण, जामीनपात्र व अजामीनपात्र वॉरंटची सर्वांनी देवाण-घेवाण केली. अवैधरित्या जनावरांची होणारी वाहतूक राखण्याचे दृष्टीने उपाययोजना करणेबाबत तसेच अवैधरित्या शस्त्र बनविणारेंची माहिती घेण्यात आली. शस्त्रांची वाहतुक कशा व कोणत्या मार्गाने होती, त्याचे बनावट कशापद्धतीने केली जाते त्याबाबत काय खबरदारी घ्यावी, याबाबत विस्तृत विवेचन करण्यात आले. अवैध दारु बनविणारे, ठेकेदार व दलाल यांची कार्य पध्दती, याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

5. राज्य सिमेलगत असलेल्या अधिकाऱ्यांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला, या व्हॉट्सॲप ग्रुपवर तसेच वेबसाईट, ई-मेलद्वारे वरील माहिती देवाण घेवाण करणे सोपे होईल.

Scanned by CamScanner

6. सदर सीमा परिषदेमध्ये चर्चा केल्यानंतर श्री विनय कुमार चौबे, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांनी सर्व उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना, प्रत्येक तीन महिन्यात सिमे लगत असलेल्या पोलीस ठाणे स्तरावर, प्रत्येक सहामहिन्यात उप विभागीय पोलीस अधिकारी स्तरावर व एका वर्षात पोलीस अधीक्षक व विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी वरील अजंड्यासह सीमा परिषद आयोजन करणेबाबत सुचित केले सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी अनुमोदन दिले.

7. अवैध अग्निशस्त्र व्यापाराचे उच्चाटन करणे हा या सीमा परिषदेचा मुख्य केंद्रबिंदू असून, अवैधपणे जनावरांची वाहतूक, अग्निशस्त्रांची तस्करी, तसेच अंमलीपदार्थांची तस्करी करणाऱ्यावर या परिषदेमुळे निश्चीतपणे जरब बसेल.

8. सदर परिषदेस श्री. ग्यानेंद्रसिंग मलिक, पोलीस महानिरीक्षक, सुरत परिक्षेत्र, गुजरात राज्य, श्री. रविंद्र कुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नाशिक शहर, श्री. ए.के. पांडे, पोलीस उपमहानिरीक्षक, खरगोन परिक्षेत्र, मध्यप्रदेश राज्य, श्री. विजय खत्री, पोलीस अधीक्षक, बडवानी, मध्यप्रदेश, श्री महेंद्र बगरिया, पोलीस अधीक्षक, नर्मादा, गुजरात, श्री. ए. एम. मुनिया, पोलीस अधीक्षक, डांग, गुजरात राज्य, श्री शदर दराडे, पोलीस अधीक्षक, सिल्वासा, दादरा आणि नगर हवेली, श्री. व्ही.एम. पटेल, पोलीस उपअधीक्षक, वलसाड, गुजरात राज्य, श्री. बी.एस. मोरी, पोलीस उपअधीक्षक, नवसारी, गुजरात राज्य, श्री. ए. वाय. बिराडे, स्था.गु.शा. तापी, गुजरात राज्य, श्री. दत्ता कराळे, पोलीस अधीक्षक, जळगाव, श्री. संजय दराडे, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, श्री. रंजन कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक, अहमदनगर, श्री. शशी कुमार मीना, पोलीस अधीक्षक, बुलढाणा, श्री. हर्ष पोदार, अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव, श्री. विजय कुमार मगर, पोलीस उपायुक्त (गुन्हे), नाशिक शहर, श्री. विशाल गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, श्री. विशाल ठाकुर, उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे ग्रामीण, श्री. अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, नाशिक ग्रामीण, श्री. संदिप गावीत, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरपूर जि. धुळे, श्री. निलाभ रोहन व श्री. एम. सुदर्शन, परिविक्षाधीन भा.पो.से. अधिकारी, श्री. अशोक कर्पे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण, श्री. सुरेश मनोरे, पोलीस निरीक्षक, वि.पो.म.नि. कार्यालय, नाशिक हे पोलीस अधिकारी आवर्जून उपस्थित होते. त्यांचा प्रतिसाद वाखाणण्याजोगा होता.

Scanned by CamScanner